ह्या लेखाचा दुवा - http://wp.me/pzBjo-LM

अमृतमंथन अनुदिनीचा दुवा- http://amrutmanthan.wordpress.com/

# पश्चिम घाट परिसर तज्ज्ञ गटाच्या अहवालाचा पाठपुरावा

**{पर्यावरण व वन मंत्रालयाला आपला अभिप्राय पाठवताना खालील मुद्यांचा विचार करता येईल}**

## 1. पार्श्वभूमी

पर्यावरण व वन मंत्रालयालाने पश्चिम घाट परिसर तज्ज्ञ गटाचा 30 ऑगस्ट 2011ला सादर केलेला अहवाल 23 मे 2012ला मुख्य सूचना आयुक्त व दिल्ली उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आपल्या संकेतस्थलावर चढवला आहे व लोकांनी आपल्या प्रतिक्रिया 45 दिवसांत पाठवाव्या असे आवाहन केले आहे.

**आजची रूढी:** लोकशाही प्रणालीना ठुकारून नेते, बाबू व धनदांडग्यांनी हातमिळवणी करून लोकांवर विकास कार्यक्रम लादणे; जोडीला अशाच संगनमतातून निसर्गसंरक्षणाचे कार्यक्रमही लोकांवर लादणे.

ह्याची दोन लक्षणीय उदाहरणे म्हणजे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कळणेवर खाण हा तथाकथित विकास कार्यक्रम लादले जाणे, आणि युनेस्कोकडे पाठवलेला पश्चिम घाट विश्व वारसा स्थल प्रस्ताव. हा युनेस्कोला गेलेला प्रस्ताव स्थानिक जनतेला हा प्रस्ताव बनवण्याच्या प्रक्रियेत सहभागी केले नाही ह्या कारणास्तव संयुक्त राष्ट्रसंघाच्या मूलनिवासी जनतेच्या व्यासपीठाने, तसेच अंतरराष्ट्रीय निसर्ग संरक्षण संघटनेने ही नाकारला.

आता पश्चिम घाट तज्ज्ञ गटाचा अहवालही ह्याच पठडीतला आहे; तो निसर्गसंरक्षण लोकांवर लादू पहात आहे असा जोरदार प्रचार चालला आहे. अहवालात एक, दोन व तीन पातळीच्या संवेदनाशील परिसरक्षेत्रांची जी आखणी सुचवली आहे, व वेगवेगळ्या पातळीवरच्या क्षेत्रांसाठी जी विकासनीती सुचवली आहे, ती तंतोतंत मान्य झालीच पाहिजे असा आमचा दुराग्रह आहे असे भासवले जात आहे.

परंतु असा आमचा बिलकुल आग्रह नाही. उलट स्पष्ट म्हटले आहे की संवेदनाशील परिसरक्षेत्रांच्या सीमा ह्या केवळ पंचायतींच्या हद्दींची व पाणलोटक्षेत्रांची तपशीलवार माहिती सहज उपलब्ध नव्हती म्हणून तालुक्यांच्या आधारावर आखल्या आहेत; तातडीने जमिनीवर पडताळून त्या सुधारणे आवश्यक आहे. तसेच वेगवेगळ्या भागांत विकास कार्यक्रमांचे नियमन कसे करावे, हेही केवळ चर्चेला एक ठोस आधार म्हणून सुचवले आहे. जागोजाग विकासाचे काय कार्यक्रम हवेत आणि काय नकोत हे शेवटी ग्राम सभा/ मोहल्ला सभा ह्यांच्याच पातळीवर स्थानिक जनतेनेच ठरवावे, आमच्या तज्ञ गटाने किंवा दिल्ली- मुंबईत ठिय्या देणाऱ्या नेते-बाबूंनी नाही असे आम्ही स्वच्छ म्हटले आहे. शिवाय केवळ नियमन सुचवलेले नाही. ऑस्ट्रेलियात आज लागू असलेल्या कार्यक्रमांच्या नमुन्यावर लोकांना शेत जमिनीत सेन्द्रिय अंश वाढवण्यासाठी; तसेच, देवराया आणि देवडोह जतन करण्यात, वन्य जीवांना संरक्षण देण्यात सहभागी होण्याबद्दलही आर्थिक प्रोत्साहन द्यावे  असे सुचवले आहे.

## 2. लोकांपर्यंत पोचू या

तज्ञ गटाची सर्वात महत्वाची शिफारस ह्या अहवालाचा ताबडतोब सुबोध मराठीत भावानुवाद करून तो सह्याद्रीच्या मुलुखातील सर्व ग्रामसभांपर्यंत, छोट्या-मोठ्या शहरांतील मोहोल्या-मोहोल्यांपर्यंत पोचवावा, आणि मग लोकांनीच निर्णय घ्यावे हीच आहे. गोव्यात प्रादेशिक आराखडा बनवताना हीच कार्यप्रणाली वापरली गेली; इतरत्रही तिचे अवलंबन करणे सहजशक्य आहे.

पर्यावरणाबाबत निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी 73व्या व 74व्या घटनदुरुस्तीनुसार राज्य सरकारांनी ग्राम पंचायती, तालुक पंचायत समित्या, जिल्हा परिषदा, नगरपालिका व महानगरपालिकांसारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांना बळकट अधिकार द्यावेत, आणि ह्या स्थानिक स्वराज्य संस्था पश्चिम घाट तज्ञ गटाच्या अहवालाच्या संदर्भात लोकाभिमुख निर्णय प्रक्रियेतून जे काय ठरेल त्याची सुव्यवस्थित अंमलबजावणी करण्यात सहभागी होतील ह्याची खात्री करावी.

ह्या पलीकडे पश्चिम घाट तज्ञ गटाच्या अहवालातील अनेक शिफारसी देशभर, सह्याद्रीच्या तसेच संवेदनाशील परिसरक्षेत्रांच्या सीमांबाहेरही अंमलात आणल्या पाहिजेत हे सर्वांना पटेल असे वाटते.

## 3. पर्यावरण संरक्षणाबाबत शासकीय कार्यवाहीतील त्रुटी

आज पर्यावरण संरक्षणाबाबत शासकीय कार्यवाहीत ज्या त्रुटी आहेत त्या दूर करण्यासाठी शासनाने निरनिराळी पावले उचलावीत असेही अहवालात सुचविले आहे.

- वायु व जल कायद्यांसारख्या प्रदूषण नियंत्राणाबाबतच्या कायद्यांची अंमलबजावणी घट्टपणे केली गेली पाहिजे
- जेव्हा लोक पर्यावरणाच्या हानीविरुद्ध निषेध व्यक्त करण्यास उभे राहतात, तेव्हा त्यांचा निषेध दडपला जाऊ नेये, उलट अशा गोष्टी निदर्शनास आणून देण्यास प्रोत्साहन दिले जावे
- पर्यावरणाबाबत निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी ग्राम पंचायती, तालुक पंचायत समित्या, जिल्हा परिषदा, नगरपालिका व महानगरपालिकांसारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांना बळकट अधिकार दिले जावे
- २००२ च्या जैवविविधता कायद्यानुसार सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांत स्थानिक निसर्गसंसाधनांच्या वापराचे नियमन करणे व संग्रहण शुल्क आकारणे ह्याचे अधिकार घट्टपणे दिलेल्या जैवविविधता व्यवस्थापन समित्या प्रस्थापित केल्या जाव्या
- २००१ च्या पिकांच्या वाणांचे संरक्षण व शेतकऱ्यांचे अधिकार कायद्यानुसार परंपारिक वाणांची नोंदणी केला जावी व अशा वाणांचे लागवडीखाली जतन करण्यासाठी पंचायतींना अनुदान दिले जावे
- २००६च्या वनाधिकार कायद्याची सुव्यवस्थित अंमलबजावणी केली जावी
- नागरिकांना पर्यावरणाची देखभाल करण्यामध्ये सहभागी करण्याची पर्यावरण वाहिनी योजना पुन्हा सुरू करावी
- पर्यावरणसंबंधित मंजुरी देण्याच्या प्रक्रियेत पुढील मूलभूत सुधारणा कराव्यात: [क] पर्यावरणावरील आघातांचे परीक्षण करण्याची जबाबदारी प्रकल्पाच्या प्रयोजकांकडून बिदागी मिळण्यावर अवलंबून नसणाऱ्या तज्ञ संस्थेकडे दिली जावी [ख] पर्यावरणावरील आघातांचे परीक्षण करण्यामध्ये स्थानिक जैवविविधता व्यवस्थापन समित्यांना सहभागी करणे सक्तीचे असावे [ग] जनसुनावणीच्या वेळी पुढे आलेली सर्व माहिती व मांडलेल्या सर्व सूचना विचारात घेणे सक्तीचे असावे [घ] पाच वर्षांसारख्या काही नियमित कालावधीनंतर पुन्हा एकदा पर्यावरणसंबंधित मंजुरी घेणे सक्तीचे असावे [च] पर्यावरणसंबंधित मंजुरी देताना घातलेल्या अटींचे पालन होत आहे अशी खात्री करून घेण्यामध्ये जैवविविधता व्यवस्थापन समित्यांना सहभागी करणे सक्तीचे असावे [छ] सुट्या सुट्या पद्धतीने नाही तर कोणत्याही एका प्रदेशातील वेगवेगळ्या प्रकल्पांतून व इतर हस्तक्षेपांतून होणाऱ्या पर्यावरणावरील आघातांचे परीक्षण साकल्याने करणे सक्तीचे असावे
- प्रादेशिक विकास योजनांची व्याप्ती वाढवून त्यांमध्ये पर्यावरण संबंधित विषयांना समाविष्ट केले जावे व अशा नियोजनात जैवविविधता व्यवस्थापन समित्यांना सहभागी करणे सक्तीचे असावे

## 4. भारताच्या पर्यावरणाबाबतचे एक विश्वसनीय व समृद्ध असे माहितीचे भांडार निर्माण करणे

शासनाने एक पारदर्शी, सर्वसहभागी असा पर्यावरण संबंधी माहिती समुच्चय निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील असावे. ह्या साठी

- शासनाजवळ असलेली सर्व पर्यावरण संबंधी माहिती तातडीने खुलेपणे उपलब्ध करून दिली जावी. उदाहरणार्थ, उद्योगधंदे कोठे बसवावेत हे निश्चित करण्यासाठी विकसित केलेला जिल्हावार माहिती समुच्चय व नकाशे लागलीच जाहीर व्हावेत
- २००६ पासून राष्ट्रीय जैवविविधता प्राधिकरणाकडे एक भारतीय जैवविविधता माहिती प्रणाली निर्माण करण्याची योजना तयार आहे, त्यावर कारवाई सुरू करावी
- NCERT तर्फे केलेल्या २००५ च्या राष्ट्रीय पाठ्यक्रम परीक्षणात सुचवल्यानुसार विद्यार्थ्यांच्या पर्यावरण विषयांत केलेल्या प्रकल्पांच्या आधारावर भारताच्या पर्यावरणाबाबतच्या माहितीचे भांडार निर्माण केले जावे.

## 5. प्रतिक्रिया पाठवण्याचा संपर्क

प्रतिक्रिया पत्राद्वारे, फॅक्सद्वारे किंवा ई-मेलनेदेखील पाठवाव्या.

Dr. Amit Love, Deputy Director,
Telephone: 011-24362827, Telefax:011-24364594,
Email: amit.love@nic.in , sv.godavarthi@nic.in.
Address: Room No. 539, Paryavaran Bhavan, CGO Complex, Lodi Road, New Delhi – 110 003.

---------------------------------

पश्चिम-घाट-तज्ज्ञ-गटाच्या अहवालाबद्दल अधिक सविस्तर माहिती खालील दुव्यावर उपलब्ध आहे.

http://wp.me/pzBjo-Lg

---------------------------------

❑ ❑ ❑